**प्रेसनोट दि. २३.०१.२०२३**

लोकसेवक श्री दिपक श्रीपती बुरूटे, वय ४६ वर्षे, व्यवसाय – दुध संकलन पर्यवेक्षक, तथा निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी सांगली मिरज रा. पूर्व म्हाडा कॉलनी, स्वामी समर्थ मंदिरा शेजारी, ता मिरज जि सांगली वर्ग ३ यांना १,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहाथ पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

---

तक्रारदार यांचे दुध उत्पादक सहकारी संस्थेचे संचालक मंडळाची बिनविरोध निवडणूक झालेली आहे. सदर निवडणूकीमध्ये संचालक मंडळ, चेअरमन, व्हाईसचेअरमन यांच्या निवडीची कागदपत्रे देणेकरिता श्री बुरूटे, दुध संकलन पर्यवेक्षक तथा निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी सांगली मिरज यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि २३.०१.२०२३ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली यांचेकडे दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २३.०१.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री बुरूटे, दुध संकलन पर्यवेक्षक यांनी तक्रारदार यांचे दुध उत्पादक सहकारी संस्थेचे संचालक मंडळाचे बिनविरोध निवडणूकीमध्ये निवड झालेले चेअरमन, व्हाईसचेअरमन यांच्या निवडीची कागदपत्रे देणेकरीता १०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि २३.०१.२०२३ रोजी लोकसेवक श्री बुरूटे, दुध संकलन पर्यवेक्षक यांचे विरूध्द जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी सांगली मिरज या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री.दिपक श्रीपती बुरूटे, वय ४६ वर्षे, व्यवसाय – दुध संकलन पर्यवेक्षक, यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री दिपक श्रीपती बुरूटे, वय ४६ वर्षे, व्यवसाय – दुध संकलन पर्यवेक्षक, यांचे विरुध्द महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस उप अधीक्षक श्री.विनायक भिलारे, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, रविंद्र धुमाळ, सलीम मकानदार,अजित पाटील, चंद्रकांत जाधव,ऋषीकेश बडणीकर, अतुल मोरे, रामहरी वाघमोडे, सिमा माने, राधिका माने, विना जाधव, चालक अनिस वंटमोरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in




(विनायक भिलारे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली

Scanned with OKEN Scanner